# आरती श्री जगदंबेची

श्री चण्डिकायै नम: ।

जय अंबे जगदंबे जगज्जननी देवी
आरती ओवाळू तुज गिरिजा भवानी
जय देवी जय देवी ॥धृ.॥

गिळूनी रक्तबीज जाळी राक्षसकुळ सर्व
तुडवूनी महादेव तू वरी करी तांडव
नाही कोणी देव दानव मानव
खेळ सारा तव तुझी न कळे करणी
जय देवी जय देवी ॥१॥

रूंडमाळा गळा रौद्र कालिका माता
भक्तां भासे सौम्य रेणुका माता
नौका होई भाविक भवसागरी पडता
दुष्टांसाठी होई दुर्जनसंहारिणी
जय देवी जय देवी ॥२॥

तारक तू मारक तू गर्वहारक जननी
कर्म ज्याचे जसे फळ देई वरदायिनी
जडो तुझे रूप मनी मुखे नाम मोहिनी
नम्र नारायण तव चरणी कल्याणी
जय देवी जय देवी ॥३॥

जय अंबे जगदंबे, जय अंबे जगदंबे !

- नारायण
०८/२२/९६
(अमेरिका)

… 2

ॐ

अंबा माता की जय !

कालिका माता की जय !

कुलस्वामिनी माता की जय !

ॐ

नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नम: ।
नम: प्रकृत्यै भद्रायै नियता: प्रणता: स्म ताम् ॥

ॐ

सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोऽस्तु ते ॥

जय अंबे जगदंबे, जय अंबे जगदंबे !